आकाशवाणी पुणे
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – १८/०५/२०२४ वार – शनिवार

पुणे जिल्हयात पाऊस, गारपिटीमुळे चार तालुक्यात १७३ हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं असल्याची माहिती जिल्हा कृषी अधीक्षक संजय काचोळे यांनी दिली. त्यामध्ये प्रामुख्यानं आंबा, केळी, भाजीपाला आणि झेंडूचं नुकसान झालं आहे.

पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची खत विक्रीमधील फसवणूक आणि लूट थांबविण्याच्या हेतूनं तालुकास्तरावर भरारी पथक स्थापन केलं आहे. खत देण्यास टाळाटाळ, अधिक दरानं विक्री, पक्की पावती न देणं अशा तक्रारी आल्यास खतविक्रेत्या दुकानावर छापा टाकला जाणार आहे. दोषी दुकानदाराचा परवाना रद्द करुन फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात येईल, असं कृषी अधिकारी भाऊसाहेब रूपनवर यांनी सांगितलं.

राज्यात १ मार्च ते १६ मे या कालावधीत उष्माघाताचे २५१ रूग्ण आढळले आहेत. पुण्यात एप्रिल आणि मे महिन्यात आतापर्यंत ११ रुग्णांची नोंद झाली आहे. अद्याप उष्माघाताशी संबंधित कोणत्याही रुग्णाचा मृत्यू झाला नाही.

पिंपरी चिंचवड शहरातल्या सर्व जाहिरात फलकधारकांनी आपला परवाना दरवर्षी नूतनीकरण करणं आवश्यक आहे. तसंच प्रत्येक फलक धारकानं संरचनात्मक लेखापरिक्षण प्रमाणपत्र सादर करणं बंधनकारक आहे, अन्यथा त्यांचा परवाना रद्द केला जाईल. जाहिरात फलकाची संरचना गंजू नये किंवा कमकुवत होऊ नये यासाठी रंगकाम करणं बंधनकारक असणार आहे, अशा सूचना पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिल्या आहेत.

पिंपरी चिंचवड शहरात विविध ठिकाणी महापालिकेची परवानगी न घेता उभारलेले जाहिरात फलक कोणत्याही भागात असतील त्यांनी उद्या म्हणजे १९ मेपर्यंत ते फलक काढून टाकावेत अन्यथा २० मे रोजी महापालिकेच्या वतीनं संबंधित फलकधारक तसंच

जागा मालकावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असंही आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितलं आहे.

पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विकास विभाग क्षेत्र क्रमांक सहानं कोथरूड परिसरातील अनधिकृत हॉटेल्सवर कारवाई केली. या कारवाईत २५ हजार चौरस फूट अनधिकृत बांधकाम काढण्यात आलं, अशी माहिती बांधकाम विभागाकडून देण्यात आली.

शिक्षण विभागातर्फे शिक्षण हक्क कायद्यांअंतर्गत सुधारित प्रवेश प्रक्रिया कालपासून सुरू करण्यात आली आहे. यात आज सकाळच्या ताज्या आकडेवारीनुसार ३० हजार २९७ पेक्षाही जास्त अर्ज जमा झाले आहेत. आरटीई प्रवेश अर्ज भरण्यास येत्या 31 मेपर्यंत मुदत आहे.

महादेव बुक ॲपच्या माध्यमातून सट्टेबाजीच्या देवाणघेवाणीसाठी १६ बँकांतील ४५२ खात्यांचा वापर करण्यात आला असून त्यापैकी अनेक खाती सर्वसामान्य नागरिकांच्या नावावर आहेत. त्यातून सट्टेबाजीचा पैसा परदेशांत वळविण्यात आला आहे का, देशविघातक कारवायांसाठी त्याचा वापर करण्यात आला आहे का, याचा तपास पुणे ग्रामीण पोलीस करत आहेत. नारायणगावातून या ॲपद्वारे ऑनलाइन सट्टा चालविण्यात येत असलेल्या इमारतीवर छापा घालून पोलिसांनी ६२ लाख ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. त्यावेळी ९३ जणांना अटक करण्यात आली असून, त्यापैकी पाच जणांना पोलिस कोठडी, तर ८८ जणांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आलं आहे.

शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील अग्रणी संस्था, पुणे विद्यार्थी गृहाचा ११५ वा वर्धापन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. सल्लागार, माजी विद्यार्थी, देणगीदार, हितचिंतक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना, पुणे आणि नाशिक इथल्या महाविद्यालयांना नॅक मूल्यांकनामध्ये ए श्रेणी मिळाली असल्याचं सुनील रेडेकर यांनी सांगितलं.

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनलवर फलाट विस्ताराचं काम करण्यात येणार असल्यामुळं डेक्कन क्वीन आणि प्रगती एक्स्प्रेस काही दिवस रद्द करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनानं घेतला आहे. तसंच काही गाड्या दादरपर्यंत धावणार आहेत. प्रगती एक्सप्रेस 28 मे ते 2 जून, पुणे मुंबई इंटरसिटी एक्सप्रेस ३१ मे ते २ जून, डेक्कन एक्सप्रेस १ आणि २ जून, डेक्कन क्वीन एक्सप्रेस १ आणि २ जून दरम्यान रद्द करण्यात आल्या आहेत.

आभासी जगात एकमेकांकडं बघून बोलण्याचं प्रमाण कमी झालं आहे, त्यामुळं तणावमुक्त जीवन जगण्यासाठी तल्लीन होऊन आनंद घ्यावा, असा सल्ला संगीतकार आणि गायक डॉक्टर सलील कुलकर्णी यांनी दिला आहे. समवेदना संस्थेच्या २१ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित 'मना तुझे मनोगत' या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. पालकत्व, मुलांशी संवाद, नातेसंबंध आणि कथाकथन अशा विविध विषयांवर डॉक्टर कुलकर्णी यांनी गप्पा, संगीत, गाणी आणि कवितांच्या माध्यमातून आपले विचार मांडले.

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने सुरु असलेल्या कॅप्टन शिवरामपंत दामले करंडक' १६ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या  राजस्थान रॉयल्स् अॅकॅडमी पुणे संघानं कोद्रे फार्मर्सचा ८ गडी राखून पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. तर पुणे क्रिकेट अॅकॅडमीनं २२ याड्‌र्स संघाचा ८ गडी राखून पराभव करत ही फेरी गाठली.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.